दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.८ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 8 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 222 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# आम्ही एकत्र आल्याने भाजपच्या बुडाला आग लागली-उद्धव ठाकरे यांचा घणाघात

## फडणवीस विकृत व हिणकस प्रवृत्तीचे असल्याची टीका

**मुंबई (वृत्तसंस्था)-आम्ही (ठाकरे बंधू) एकत्र आल्यामुळे भाजप नेत्यांच्या बुडाला आग लागली आहे. ही आग सर्वांपुढे दाखवताही येत नाही आणि शमवताही येत नाही, अशी तिखट टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी भाजपवर शरसंधान साधताना केली. मराठी माणसांचे आनंदी क्षण ज्यांना रुदाली वाटत असतील, ते अत्यंत विकृत व हिणकस व्यक्तीची माणसे आहेत, असेही ते यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले.उद्धव ठाकरे आज विधिमंडळात आले होते. यावेळी त्यांनी मराठीच्या मुद्यावरून राज व उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करणाऱ्या भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यासह राज्यातील सर्वच भाजप नेत्यांचा येथेच्छ समाचार घेला. ते विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आम्ही एकत्र आल्यामुळे या लोकांच्या बुडाला आग लागणे स्वाभाविकच आहे. कारण, भाजपचे राजकारणच तोडा, फोडा व राज्य करा यावर अवलंबून आहे. लोकांच्या घरांच्या होळ्या पेटवायच्या व त्यावर आपल्या राजकारणाच्या पोळ्या भाजायच्या हाच भाजपचा धंदा आहे. हा धंदा आता संपला आहे. त्यामुळे त्यांच्या बुडाला आग लागल्याचे मी समजू शकतो.**

ते पुढे म्हणाले, काही लकडबग्घे (तरस) आहेत. हे लोक इथे गुण्यागोविंदाने राहणाऱ्यांमध्ये आग लावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी काहीही बोलावे. त्यांना इथे कुणीही ओळखत नाही. मी त्यांना तरस या प्राण्याची उपमा दिली. पण हे लोक त्या ही लायकीचे नाहीत. काड्या करणे हाच त्यांचा उद्योग आहे. त्यांनी इकडे येऊन पाहावे. आमचा कोणत्याही भाषेला विरोध नाही. भाषेच्या सक्तीला विरोध आहे. त्यामुळे तुम्ही उगीच भाषिक वाद इकडे करू नका. आमच्याकडे सगळे आनंदाने राहतात. शिवसेना व शिवसैनिक रक्तदान, रुग्णवाहिका आदी सर्वच सेवा कोणतीही जात-पात धर्म न पाहता पुरवतात. त्यामुळे या बाहेरच्या लोकांनी स्वतःचे घर पाहावे. स्वतःचा पक्ष जो मेलेला आहे, तो जिवंत होतो का हे पहावे.भाजप आमदार आशिष शेलार यांनी मराठीसाठी लढणाऱ्यांची तुलना पहलगाम हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांशी करत आहेत. पत्रकारांनी हा प्रश्न उद्धव ठाकरे यांना केला. त्यावर ते म्हणाले, मराठी माणसांची तुलना अतिरेक्यांशी करणारे लोक मराठी व महाराष्ट्राचे मारेकरी आहेत. या



मारेकऱ्यांना मराठी लोकांनी आता ओळखले पाहिजे. हे मराठी भाषेचे मारेकरी आहेत. त्यांनी हा विषय काढलाच असेल तर पहलगामचे अतिरेकी भाजपमध्ये गेले का? हे त्यांनी सांगावे. ते सापडत का नाहीत? जे लोक आमच्यावर आरोप करत आहेत, त्यांच्या घरात हे अतिरेकी राहत आहेत का? गेले कुठे? त्यांना लाज वाटली पाहिजे. एकतर ती हिंदूंना वाचवू शकत नाही आणि मराठी माणसांवर अन्याय करणाऱ्यांची बाजू घेता. हे कर्मदरिद्री लोक आपल्या महाराष्ट्रात दुर्दैवाने राज्यकर्ते आहेत. याची लाज वाटते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विजयी मेळाव्यातील भाषणाची रुदाली अशी हेटाळणी केल्याची बाबही पत्रकारांनी यावेळी उद्धव ठाकरे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर ते म्हणाले, मी त्यांची मानसिकता समजू शकतो. कारण, मूळ भाजप हा पक्ष मेलेला आहे. त्याचाच खून या लोकांनी केला आहे. त्यांचे जे काही रुदाली सुरू आहे, हा रुदाली सुद्धा हिंदी शब्द आहे. त्यामुळे ते आपला उर बडवत आहेत. हा उर बडवण्यासाठी त्यांनी आमच्या पक्षातले उरबडवे घेतलेत. काँग्रेसचे उरबडवे घेतले. राष्ट्रवादीचे उरबडवे घेतलेत. त्यांनी देशभरात इतर पक्षांतील उरबडवे घेतलेत.कारण शिवसेनेसोबत युती करणारा मूळ भाजप या लोकांनी मारून टाकला. त्याचे दुःख व्यक्त करताना जे उर बडवत आहेत, ते उर बडवायला सुद्धा त्यांची ओरिजनल माणसे नाहीत. त्यामुळे फडणवीसांची प्रतिक्रिया मी समजू शकतो. पण मराठी माणसांचे आनंदी क्षण ज्यांना रुदाली वाटत असतील, ते अत्यंत विकृत व हिणकस व्यक्तीची माणसे आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले.दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी यावेळी विजयी मेळाव्यावर मुंबईतील हिंदी भाषिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मराठीसाठी जे काही करावे लागेल ते सर्व करण्याची तयारीही दर्शवली.

### सुभाषराव पवळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

# सुभाषराव पवळ ऊर्जादायी व्यक्तिमत्व-आ.विजयसिंह पंडित

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील ऑलिव्ह हॉटेल येथे शनिवार २८ जून २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाषराव पवळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित यांची उपस्थिती होती.सत्कारमूर्ती सुभाषराव सुंदरराव पवळ प्रमुख अतिथी माजी आमदार राजेंद्र जगताप ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोकराव डक ,भाजपा युवा नेते शिवराज पवार,बीड जिल्ह्याच्या नेत्या प्रा. सुशीला मोराळे ,जेष्ठ विधीज्ञ माजी सरकारी वकील ड.कृष्णाजी पंडित,नारायण गडाचे विश्वस्त बी बी जाधव साहेब, ड.महादेव तुपे , उद्योजक नितीनराव तौर,उद्योजक राजेंद्र मनोत,उद्योजक अंगद नवले, प्रगतशील शेतकरी उद्योजक अभिजीतराव भांगे, लोकपत्रकार भागवत तावरे,संस्थाचालक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दीपक घुमरे, संस्थाचालक संभाजी करांडे ,संस्थाचालक ड. विश्वनाथ मगर,संस्थाचालक गणेश वाघ



,संस्थाचालक उत्तमराव पवार,संस्थाचालक महादेव काळे, संस्थाचालक दिनेशलाला पवार,कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील,प्राचार्य राजकुमार कदम माजी प्राचार्य जालिंदर पैठणे,मुख्याध्यापक राजेंद्र केसभट ,मुख्याध्यापक भारत मगर ,मुख्याध्यापक संजय गोरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वर्गीय सुंदरराव पवळ यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलन करण्यात आले.समर्थ विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनीने सर्व पाहुण्यांचे स्वागत गीताने स्वागत केले.उपस्थित पाहुण्यांचे गौरव सोहळा समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. सत्कारमूर्ती सुभाषराव पवळ यांचा सर्व पाहुण्यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह,मानपत्र देऊन सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत तांबारे यांनी केले.यावेळी राजकुमार कदम, जालिंदर पैठणे,बी .बी जाधव ,भागवत तावरे, सत्येंद्र पाटील ,सुशीला ताई मोराळे यांनी शुभेच्छा व्यक्त करून पुढील वाटचालीस दादांना सदिच्छा दिल्या. माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी आपल्या शुभेच्छा मनोगतात समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना सुंदरराव आप्पा यांचे स्नेहाचे संबंध तसेच इथून पुढे शैक्षणिक क्षेत्रात नवीन प्रकल्प व उपक्रम हाती घ्यावे असा मौलिक संदेश दिला. सत्कारमूर्ती सुभाषराव पवळ यांनी उपस्थित सर्व अतिथींचे व उपस्थितांचे शुभेच्छा स्वीकारून आभार मानले. अध्यक्षीय भाषणात आमदार विजयसिंह पंडित यांनी पवळ कुटुंबीय हे आमच्या शिवछत्र परिवाराचा एक पिल्लर आहे सुभाषराव हे खूप ऊर्जादायी व्यक्तिमत्व आहे त्यांच्यामध्ये खूप उत्साह आहे पुढील काळात त्यांनी शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काम करावे असे मत व्यक्त केले. आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या जोशपूर्ण भाषणाने उपस्थिताचि मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद मगर यांनी केले. राजकीय,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्व स्तरातील बहुसंख्य लोक उपस्थित होते. सर्व उपस्थितांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंद संपन्न झाला.

# परशुराम आर्थिक विकास महामंडळ नक्की उत्कृष्ट कार्य करेल-कॅप्टन आशिष दामले



**केज । प्रतिनिधी**

परशुराम आर्थिक विकास महामंडळ चे अध्यक्ष केज येथे भेटीसाठी आले असता शासकीय विश्रामगृह येथे त्यांचा सत्कार चतुर्वेद प्रतिष्ठान व समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या वतीने करण्यात आला. यावेळी सामाजिक विविध विषयावर चर्चा करण्यात आली यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीयकृत बँका या विनातारण कर्ज देत नाहीत १० लक्ष पर्यंत विनातारण कर्ज द्यायचा असा नियम असतानाही बँका लक्ष देत नाहीत तसेच कागदपत्रे च्या नावाखाली परेशान करतात खाजगी बँका तयार असतात परंतु त्यांना तारण लागते अश्या परिस्थिती मध्ये अनेक ब्राह्मण तरुणांना त्रास सहन करावा लागतो याबद्दल आपण बँकाना तस्या सुचण्या द्याव्यात अशी मागणी कॅप्टन आशिष दामले यांच्याकडे केली. तसेच पुरोहित बांधवाना मानधन व ब्राह्मण संरक्षक कायदा या व इतर उर्वरित मागण्यासाठी आपण आम्हाला सहकार्य करावे अशी इच्छा देखील व्यक्त केली

यावेळी बोलताना कॅप्टन आशिष दामले म्हणाले की आपण सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे तीन लक्ष पर्यंत थेट कर्ज व १० लक्ष पर्यंत विनातारण कर्ज नक्कीच मिळेल शिक्षण साठी देशात १० लक्ष व परदेशात २० लक्ष शैक्षणिक कर्ज महामंडळ कडून मिळेल असा प्रस्ताव दिलेला आहे मंजुरी मिळताच आपण नव्या जोमाने काम करू आपण आम्हाला थेट बोलत चला आपण नक्कीच इतिहास घडऊ असे म्हणाले ना अजितदादा पवार साहेब यांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळ ला निधी कमी पडणार नाही असे आश्वासन दिले आहे आणि निधी कसा आणायचा याची मला माहिती आहे असे सांगितले.

यावेळी चतुर्वेद प्रतिष्ठान व समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या वतीने कॅप्टन आशिष दामले यांचा सत्कार केला यावेळी धनंजय कुलकर्णी, श्रीनिवास केजकर, श्रीराम शेटे, अनंत कोकीळ, श्रीधर खोत, चंद्रकांत पाटील,ऋषिकेश जोशी, उदय कुलकर्णी, महेश येवतेकर, गुणवंत जोशी, यावेळी संघर्ष समितीचे उपोषण कर्ते दिपक रननवरे हे ही उपस्थित होते.

# ॲट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपी हनुमंत अशोकराव गुट्टे व अन्य तीन जणांचा जामीन फेटाळला-ॲड.एस.के.घाडगे

**परळी । प्रतिनिधी**

परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल ॲट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपी हनुमंत अशोकराव गुट्टे व अन्य तीन जणांचा सादर झालेला जामिन अर्ज नामंजूर केला आहे. सदर अर्जावर सुनावणीदरम्यान फिर्यादीतर्फे माझ्यामार्फत (ड. एस. के. घाडगे, जिल्हा व सत्र न्यायालय, अंबाजोगाई) मुद्देसूद, कायदाशीर आणि प्रभावी युक्तिवाद सादर करण्यात आला. युक्तिवादात गुन्ह्याची पार्श्वभूमी, सामाजिक परिणाम, साक्षींची सुरक्षा, तसेच आरोपींच्या प्रभावाचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला. न्यायालयानेही या सर्व



मुद्द्यांचा विचार करून गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असून प्रथमदर्शनी आरोपीविरुद्ध आरोप स्पष्ट दिसतात, म्हणून त्यांना सध्या जामिन दिला जाऊ शकत नाही, असा स्पष्ट नमूद आदेशात केला आहे.

सदर निकालामुळे पीडित पक्षाला संरक्षण लाभले असून, समाजात कायद्याचा धाक आणि न्यायालयीन प्रक्रियेवरील विश्वास दृढ झाला आहे. माझी नेहमीची भूमिका म्हणजे दुर्बल, पीडित आणि अन्याय सहन करणाऱ्या घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयात प्रभावी युक्तिवाद करणे. यापूर्वीही अनेक ॲट्रॉसिटी, पोक्सो आणि गंभीर स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये मी फिर्यादी पक्षाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले आहे.

# केज तालुक्यात पिके जोमात आंतरमशागतीच्या कामांना वेग

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सध्या खरीप पिकांची पेरणी उरकलेली असून पिके जोमदार आहेत. आता आंतरमशागतीच्या कामाला वेग आला आहे.

केज तालुक्यातील केज, विडा, हनुमंत पिंपरी, युसुफवडगाव, होळ आणि नांदूरघाट या सात मंडळात खरिपाच्या पेरण्या झालेल्या आहेत. मात्र आडस परिसरात अनेक ठिकाणी.पेरण्या झालेल्या नाहीत.

या वर्षी मृग नक्षत्रात पडलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणच्या पेरण्या उरकलेल्या आहेत. अगदी मृग नक्षत्रात पेरण्या झाल्याने पिकांची चांगली वाढ होत असून पिके जोमदार आहेत. आता शेतकऱ्यांनी कोळपणी सारखे अंतर मशागतीच्या कामाला सुरुवात केली आहे. तर नगदी पीक म्हणून शेतकरी सोयाबीन आणि कापसाला प्राधान्य देत असल्याने याही वर्षी सोयाबीनचे जास्त क्षेत्र लागवडीखाली आहे.



## संपादकीय..

# दिल दोस्ती दुनियादारी



दोस्तों के नाम का एक खत जेब में रख कर क्या चला, करीब से गुजरने वाले पूछते है, इस इत्र का नाम क्या है...!!

गुलजार यांच्या या हिंदी शेरामध्ये मैत्रीबद्दलची कमाल व्याख्या स्पष्ट होते. मैत्रीला उंचावर नेऊन ठेवण्याचं कसब कवींमध्ये असलं तरी, मैत्रीला स्वत:चं असं एक स्थान आहे, जे अव्वल दर्जाचं मानलं जातं. मैत्री कधीही आणि कोणाशीही होऊ शकते. ती ज्याची-त्याची वा साध्या प्रसंगी वा विशेष कारणामुळे होत असल्याने मैत्रीबद्दल शंकेचं कारणचं उरत नाही. जीवाला जीव देणाऱ्या मैत्रीची खासियत वेगळीचं असते. नात्यापलीकडील भावनेच्या अंतर्गत जीवाभावाच्या निश्चयाची खूणगाठ बांधणारे मित्र आसपास असल्याने विवेक बुद्धीने जो संवाद साधतो, ज्याच्याकडे जराही आकस नसतो, हेवा नसतो, लोभ-द्वेष नसतो, त्याचं मैत्रेय लवकर जुळतं. अशा मैत्रीला परिमाण नसलं तरी, विचार मात्र जुळावे लागतात.किंबहुना जाणारा तोल आपल्या कौशल्याने सांभाळणारा एक तरी मित्र तिथं असल्याने तो खऱ्या मैत्रीला न्याय देतो आणि उत्तम मित्रत्वाच्या पंगतीत जाऊन बसतो; म्हणूनचं खरेपणा शाबूत ठेऊन खोटेपणाची झळ बसू न देणारी मैत्री चिरकाल टिकते असं म्हणतात. सुस्थितीला मैत्रीचं माप वगैरे म्हणता येत नाही. कारण मैत्रीचं खरं मूल्यमापन आपत्ती काळातचं होतं. एका भावाची, मताची माणसं एकत्र आल्यावर हृदयात अपार सेवा भरली जाते आणि सर्वचं आपले मित्र होऊन जातात. तरीही कौशल्य गुणाच्या वापराने भासणं आणि असणं यातली तफावत ओळखता यायला पाहिजे. नाहीतर करून गेलो राव, ओळखता आला नाही मैत्रीचा डाव अशी दयनीय अवस्था व्हायची.एक अभ्यास म्हणून आपल्या जीवनात असंख्य माणसं जोडली जात असली तरी, मैत्रीचे बंध अभावानेचं जुळल्याची उदाहरणं दिसून येतात. हृदयाची भाषा हृदयाला कळू लागली की, स्नेह वाढू लागतो जो नात्यात लवचिकता भरतो. सुमधुर प्रशंसा, धीरगंभीर शब्द, प्रेमळ उत्तेजन, सहानुभूतीमय सांत्वन, चुकांसाठीची उपदेशवाणी ज्याच्याकडून लाभते किंवा मिळते तो सहज मित्रत्वाच्या वर्तुळात सामावला जातो.सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत खऱ्या मैत्रीबद्दल आपल्या कवितेत म्हणतात, दु:ख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा. अशा या मैत्रीबद्दलचा आशय जरी सोपा असला तरी त्याची घनता मोजता येत नाही. सख्ख्या आणि सच्च्या मित्रांशिवाय आयुष्य म्हणजे, सूर्याशिवाय आकाश. मग विचार करा या तेजस्वी सूर्याचं दर्शन दुर्लभ झालं तर, अंधकार माजेल. विचारांचा गोंधळ उडेल, व्यक्त करण्यातली अडचण घेऊन माणसं बिनमैत्रीची वावरू लागली तर तारतम्य सुटेल, ती वेडी होतील. तेव्हा आयुष्यात मित्र वा मैत्रीण हवीचं. ज्यांना यातलं कोणी नसतं ते एकटे पडतात. दुसरं म्हणजे मैत्री ही केवळ मनोरंजनासाठी नसून आपल्याकडील सुखदु:ख शेअर करण्याचा एकमेव सोपा मार्ग आहे. लखलखीत, स्वच्छ मार्गातल्या पारदर्शी नात्यात विद्या, शूरता, बळ, दक्षता, धीरोदत्त उदारमतवादी गुण आले की, मैत्रीला उणे पडत नाही. जसं की, ज्ञानोपासनेला सुधारणेची जोड मिळत ग्रंथ-पुस्तक आपल्यावर संस्कार करतात काहीसे तसेच; परंतु विशिष्ट हेतूकरिता केलेली मैत्री अखेरपर्यंत टिकत नाही. तोंडावर गोड बोलून मागून पलटवार करणारे मित्रमैत्रिणी घातकी असतात हेही खरंय. वैर करणाऱ्या, वैर धरणाऱ्या मित्रावर जास्त विश्वासार्हता बाळगूच नये.मित्र-मैत्रिणींच्या दुनियेतलं मोठं वरदान विवेकी मित्र मिळण्यात आहे असं मला नेहमी वाटतं. तुम्ही स्वतः चांगले मित्र किंवा मैत्रीण बनण्याच्या प्रयत्नात असाल तर समोरून मित्रत्वाची चांगलीच साद येईल. उत्तम मित्रांच्या संगतीत आपली प्रगती होते हे खरं असलं तरी, शत्रू आणि मित्र आपल्या कृतीमुळेच निर्माण होतात.कधी शत्रू मित्र होतो तर कधी मित्र शत्रू म्हणून वावरतो. थोडक्यात दिलोंकी यारी म्हणजे चहासोबत खारी आणि तुझ्या दोस्ती पुढे मित्रा फिकी पडते दुनियादारी. चांगली आणि सुदृढ मैत्री रत्नजडीत मुकुटासारखी असते. तुमचा मित्र परिवार कितीही मोठा असला तरी, प्रत्येकाची तुमच्याशी असलेली बांधिलकी तुम्ही कसे वागता यावर अवलंबून असल्याने, थोडक्यात सांगायचं तर निष्ठावान मित्र आपल्या आयुष्यात टॉनिकसारखे असतात; हा माझा अनुभव आहे. मित्र असावा तर तो हक्काचा, संकटात मदतीचा, काळीज तुकड्याचा, घोर विश्वासाचा, दु:खात भरवशाचा, नैराश्येत आशेचा, अंधारात तेजाचा.मंडळी वर्षातून साजरा होणारा मैत्री दिन एका दिवसाची गोष्ट ठरत नाही. मूठभर विश्वास चांगल्या मैत्रीची पाळमुळं रुजवत मैत्रीचा पाया भक्कम करतो. दुनियादारीशी इमान राखत, अशा या मैत्रीला कुणाची दृष्ट न लागो...

# मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली



मागील आठ ते दहा वर्षांमध्ये आपल्या राज्यात जून महिना संपत आला तरी पुरेसा पाऊस पडला नव्हता. त्यामुळे बऱ्याच वेळा शेतकरी राजाला दुबारा पेरणी करावी लागली होती. यात अनेक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले होते. यावेळी अगदी मे महिन्याच्या प्रारंभापासून पावसाने सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकरी राजा चिंतेत दिसत आहे. शेतीची कामे सोडा. हातातोंडाला आलेल्या पिकाला सुद्धा शेतकऱ्यांना वंचित व्हावे लागणार आहे. तसेच कोपऱ्यात साठलेल्या पाण्यामुळे पिकलेली पिके कुजणार आहेत. याचा परिणाम शेतकरी दादांच्या उत्पादनात घट होणार हे मात्र नक्की. मग संसार चालणार कसा...! तेव्हा मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली असली तरी शेतात पाणी साचल्यामुळे उन्हाळ्यात पिकलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मागील आठवड्यात कोकण रेल्वेने मुंबईला येताना बऱ्याच ठिकाणी पिकलेले भात वाफ्यात पाणी साचल्यामुळे पाण्यात तरंगताना दिसत होते. काही वाफ्यात भात कापून पसरून ठेवले होते. तेव्हा अशा भाताला कोंब येणार. म्हणजे शेतकरी दादांची उन्हाळी मेहनत पूर्ण पाण्यात जाणार आहे. अशा शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसानभरपाई मिळायला हवी. त्यासाठी ज्या शेतकऱ्यांचे पावसामुळे नैसर्गिक नुकसान झाले असेल त्यांचे पंचनामे करून योग्यती कारवाई शासन पातळीवर होणे गरजेचे आहे. म्हणजे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळाल्यामुळे पुढील शेतीची कामे करणे सोयीचे होईल. यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक शासनमान्य असायला हवा. तरच त्यांना शासकीय विविध योजना व अनुदानाचा लाभ घेता येणार आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवले नसेल तर आपल्या जिल्ह्यातील नागरी सुविधा केंद्रावर तयार करून घ्यावे.

सध्याच्या बदलत्या हवामानाचा विचार करता शेतकऱ्यांचे सर्वात जास्त नुकसान होत आहे. ही परिस्थिती शेतीप्रधान देशाला पोषक नाही. उन्हाळ्यामधील मे महिना म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीचा काळ. जमिनीची मशागत करण्यापूर्वी शेत जमिनीत पाणीच पाणी. मग मशागतच झाली नाही, मग सांगा पेरणी कशी करणार. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वतीने शेतकरी चिंतेत असू नये म्हणून विविध माध्यमांच्या माध्यमातून बातम्या प्रसारित करण्यात येत आहेत.

कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कृषी विभागाच्या वतीने सन २०२५-२६ या खरीप हंगामासाठी जिल्हा व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये कृषी निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. कृषी निविष्ठाची गुणवत्ता, शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण व योग्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. असे जर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात झाले तर शेतकरी राजाला अधिक बळ येईल.

महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पुढील दोन आठवड्याने हवामान कोरडे होण्याची शक्यता आहे असे आवाहन राज्यातील कृषी विभागाने शेतकरी बांधवांना केले आहे. यात कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जास्त धोका आहे. जर पेरणी केली तर राज्यातील हवामान विभागाच्या अंदाजाप्रमाणे ५ जून नंतर मान्सून थांबल्यास दुबारा पेरणी करण्याची नामुष्की शेतकऱ्यांवर येईल. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे असे वाटत असले तरी कोरडवाहू जमीन सोडून नदी नदीकाठच्या ज्या शेतजमिनी आहेत तेथे भाताची पेरणी करायला काहीच हरकत नाही त्यासाठी प्रथम लागवड करून नंतर पेरणी करावी. त्यासाठी कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतल्यास अधिक उत्तम होईल.

कोकणातील शेतकऱ्यांच्या मते, एकदा जमीन थंड झाली की, पेरणी करून सुद्धा भात रुजून येत नाही. पाऊस पडल्या पडल्यास पेरणी केल्यास पेरलेले भात रुजून येते. मात्र नंतर पावसाने पाठ फिरवता कामा नये. यासाठी मशागत महत्त्वाची असते असे सांगायला विसरत नाहीत. हा आहे अनुभव. बऱ्याच वेळा शेतीसाठी अनुभव उपयोगाचा असतो. तेव्हा मे महिन्याचा विचार करता पावसाचे लवकर आगमन झाल्याने शेतीच्या दृष्टिकोनातून कृषी विभागाचा सल्ला घेणे शेतकऱ्यांना जास्त हिताचे ठरणार आहे. जर नैसर्गिक आपत्ती आल्यास शासनच आर्थिक मदत करणार आहे. कायद्याचा विचार करता शासकीय स्तरावरील मार्गदर्शन लाभदायक ठरेल. तेव्हा केव्हाही पुस्तकी ज्ञान अधिक मार्गदर्शक ठरते. असे असले तरी आता जरी कृषी विभागाने राज्यातील शेतकऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला तरी अंदाजे मान्सूनचे आगमन या वर्षी लवकर होण्याची शक्यता आहे असे जरी वर्तविले असते तर शेतकऱ्यांनी आपली लागवडीची कामे लवकर करून घेतली असती. तेव्हा राज्यातील कृषी तसेच हवामान विभागाने सतर्क राहाणे योग्य आहे. कारण शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे विसरून चालणार नाही.

तेव्हा या वर्षी शेतकऱ्यांच्या ध्यानीमनी नसताना सुद्धा लवकर पावसाने हजेरी लावली मात्र कालपासून थोडी विश्रांती घेतल्यासारखी वाटत आहे. याचा परिणाम राज्यात अनेक ठिकाणी नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी गावांचा सुद्धा संपर्क तुटला आहे. आता मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबल्यामुळे शेतकरी राजाची चिंता वाढली आहे. यासाठी शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जरी जाहीर केली तरी झालेले नुकसान भरून येणार नाही. तेव्हा राज्यातील शेतकऱ्यांच्या भविष्याचा विचार करता कृषी व हवामान विभागाने वेळच्या वेळी शेतकऱ्यांना सूचना तसेच सल्ला देणे राज्याच्या हिताचे ठरेल. म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांनी आपली कामे वेळच्या वेळी केल्यास शेतीची कामे खोळंबणार नाहीत.

# पारदर्शक कारभार कुठे आहे?

राज्यात, महापालिकेत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता कुणाचीही असली तरी विकासाची आणि दुरुस्ती-देखभालीची कामे ठेकेदारांना देणारी यंत्रणा तीच असते. सरकार बदलले किंवा महापालिकेतील सत्ताधारी बदलले तरी संवेदनशील खात्यातील अधिकारी, कर्मचारी, अगदी कारकून-शिपायापर्यंत स्टाफ वर्षानुवर्षे त्याच जागी असतो. कोणते काम कुणाला द्यायचे याची मोठी साखळी असते. राजकारणी, अधिकारी, ठेकेदार यांचे हितसंबंध ही साखळी जपत असते. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई महानगराची वाताहत होते. मुंबईची तुंबई होते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे कामात होणारा भ्रष्टाचार आणि टक्केवारी आहे. जोपर्यंत देवघेव संस्कृती संपुष्टात येणार नाही तोपर्यंत नालेसफाई किंवा कचरा सफाईवर हजारो कोटी खर्च केले तरी मुंबईची तुंबईपासून सुटका होणार नाही.

दि. २६ मे रोजी पहाटेपासून जोरदार पावसाने मुंबई महानगर प्रदेशावर आकांडतांडव केल्यानंतर देशाची आर्थिक राजधानी जवळपास ठप्प झाली. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईचे जीवन विस्कळीत झाले. सखल भाग, रस्ते आणि रेल्वे मार्ग पाण्याखाली गेल्याने उपनगरी रेल्वे, बेस्ट बसेस, मेट्रो रेल्वेने माना टाकल्या. जोरदार पावसाने मुंबई बंद होणे किंवा विस्कळीत होणे हे काही मुंबईकरांना नवीन नाही. दरवर्षी पावसाळ्यात साधारणपणे जुलै महिन्यात पावसाने मुंबईत हाहाकार होतो. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईकरांना गुडघाभर पाण्यातून चालावे लागते. दरवर्षी पाणी साचण्याची ठिकाणे वाढत आहेत. दरवर्षी नालेसफाईची बोंब आहे. दरवर्षी रस्त्यावरील कचरापेट्या साफ=होत नाहीत हाच अनुभव आहे. दरवर्षी पदपथ व रस्त्यावरील अतिक्रमणे वाढतच आहेत.

मुंबईला नागरी सेवा देण्याची जबाबदारी मुंबई महापालिकेवर आहे. देशातील सर्वांत श्रीमंत महापालिका असा तिचा लौकिक आहे. यावर्षी मुंबई महापालिकेचे बजेट ७२ हजार कोटी आहे. म्हणूनच मुंबई महापालिकेवर आपली सत्ता असावी. महापालिकेवर आपले वर्चस्व असावे असे प्रत्येक राजकीय पक्षाला वाटते. मुंबईची सेवा करण्यासाठी किती जण निवडणुका लढवतात हा एक अभ्यासाचा विषय आहे. पण निवडून आल्यानंतर नगरसेवकांची कशी भरभराट होते हे मतदारांना बघायला मिळते. मुंबईत आमदारांपेक्षा नगरसेवकाला जास्त महत्त्व असते. कारण महापालिकेच्या स्थानिक कामांमध्ये त्यांच्या शिफारसीला महत्त्व असते. नगरसेवक कसे झटपट गडगंज होतात, हे जनतेला समजते. महापालिकेबरोबरच नगरविकास, महसूल ही खाती मध्यस्थांनी नेहमीच वेढलेली असतात. मुंबई महापालिका, म्हाडा, एसआरए, एमएमआरडीए (मुंबई महानगर विकास प्राधिकरण), सिडको, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम अशा डझनभर यंत्रणांना मुंबईत मोठे महत्त्व आहे. त्यावर नेमणुका, बदल्या व बढत्यांसाठी काय काय करावे लागते याचे भरपूर किस्से ऐकायला मिळतात. या सर्व यंत्रणांवर राज्याच्या प्रशासकीय मुख्यालयातून म्हणजेच मंत्रालयातून थेट नियंत्रण असते. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेची निवडणूकच झालेली नाही. राज्यातील सर्व महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक किंवा आयुक्तांमार्फत कारभार चालू आहे. अनेक महापालिका, पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार ते पाच वर्षे झाल्या नसल्याने राजकीय पक्षांचे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. राज्यकर्ते मात्र खूश आहेत. थेट मंत्रालयातूनच सर्व महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालू असल्याने त्यात नगरसेवकांचा कुठेही वाटा नसतो.

दि. २६ मे रोजी मुसळधार पावसाने मुंबईची तुंबई झाली, तेव्हा देशाची राजधानी असलेल्या महानगराची दरवर्षी तुंबई होण्यास जबाबदार कोण? या प्रश्नावर माध्यमातून चर्चा झाली. तेव्हा भ्रष्टाचार हेच उत्तर अनेकांकडून ऐकायला मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील एका बड्या माध्यम समूहाला दिलेल्या सविस्तर मुलाखतीत राजकारणाचे अवमूल्यन झाल्याचे मान्य केले आहे. तसेच मुंबई महापालिका कारभारात होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत चिंताही व्यक्त केली आहे. प्रशासनातील भ्रष्टाचार आपण खपवून घेणार नाही, असा सज्जड दमही दिला आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेवर प्रशासकीय कारभार आहे. महापालिकेवर थेट नियंत्रण मंत्रालयातूनच आहे. मुंबई महापालिकेवर ठाकरे यांच्या शिवसेनेची पंचवीस वर्षे सत्ता होती, तेव्हापासून चालू असलेला भ्रष्टाचार आजही चालूच आहे. भ्रष्टाचार, टक्केवारी आणि घोटाळे हा मुंबई महापालिकेला लागलेला शाप आहे. मुंबई महापालिका शापमुक्त कधी होणार हा कळीचा मुद्दा आहे. गेल्या काही वर्षांत मुंबईत एकाच वेळी मेट्रो, रस्ते, उड्डाणपूल, पादचारी मार्ग, काँक्रिटीकरण, रस्ते दुभाजक अशी विविध कामे चालू आहेत. संपूर्ण मुंबई ठिकठिकाणी खोदलेली आहे. कामाच्या ठिकाणी पत्रे लावले असल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. शिवाय बारा ते पंधरा हजार इमारतींची कामे चालूच आहेत. वाहतुकीची कोंडी नाही असा रस्ता मुंबईत शोधून दाखवा अशी स्पर्धा लावण्याची वेळ आली आहे. मुंबईतील प्रत्येक रस्त्यावर खड्डे आहेत किंवा त्याला भेगा पडलेल्या आहेत. देशाची राजधानी नवी दिल्लीत जर सुंदर, गुळगुळीत, प्रशस्त, रुंद रस्ते आहेत, अतिक्रमणमुक्त पदपथ आहेत मग देशाच्या आर्थिक राजधानीत व राज्याच्या राजधानीत चांगले रस्ते व मोकळे पदपथ का मिळू नयेत? रस्त्यांची कामे व पदपथ या कामात सर्वाधिक भ्रष्टाचार होतो हे काही गुपीत नाही. पण तो कोणीही थांबवू शकले नाही. गेली तीन वर्षे नगरसेवक नाहीत. आमदार हाच मतदारसंघात प्रमुख लोकप्रतिनिधी आहे. त्याच्या वॉर्डात तोच सर्वस्व असतो. त्याच्या शिफारसींनुसार महापालिकेतील व पोलीस स्टेशनवरील नेमणुका होत असतात. त्याला सहसा सरकार दुखावत नाही. पण दुय्यम दर्जाच्या कामाबाबत आमदाराला कोणी जबाबदार धरत नाही.

उत्तर प्रदेशातील गंगा नदी शुद्धीकरणावर हजारो कोटी खर्च झाले, गंगा नदी झाली का शुद्ध? पुण्याच्या मुठा नदीच्या प्रकल्पावर केंद्राने आठशे ऐंशी कोटी मंजूर केले, ते पैसे कशावर खर्च झाले? मुंबईच्या मिठी नदीतील गाळ काढण्यावर ४०० कोटी खर्च झाले, मिठी नदी स्वच्छ तर झाली नाहीच पण बनावट बिले सादर करून ठेकेदारांनी पैसे उकळले. आता म्हणे ६५ कोटींचा घोटाळा झाला असे सांगण्यात येत आहे. महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताशिवाय असा घोटाळा होऊ शकतो का? महापालिका व खासगी कंपन्यांचे मिळून तेरा जणांना अटक झाली आहे.

गेल्या काही वर्षांत आपल्या कार्यकर्त्यांना खूश करण्यासाठी त्यांना कामांची कंत्राटे देण्याची प्रथा सुरू झाली आहे. कोरोना काळातही इस्पितळांमध्ये जेवणखाणाची हजारो कोटींची कंत्राटे तेव्हा सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिली होती, त्यांनी सब कॉन्ट्रॅक्ट देऊन कमिशनपोटी भरपूर पैसे कमावले. त्याची लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून चौकशीही झाली व आरोपपत्र दाखल झाले. आपण मतदारसंघात लोकांसमोर सतत राहिले पाहिजे म्हणून कार्यकर्त्यांना पैसे देऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यास सांगितले जाते. होर्डिंग्ज, पोस्टर लावून नेत्यांच्या छब्या झळकवल्या जातात. हे सर्व पैसे कोठून येतात? विकास प्रकल्पांवर व नागरी सुविधांच्या कामावर कोटी कोटी खर्च दाखवले जातात, ते खरोखरच त्या कामांवर पूर्णपणे वापरले जातात का? गेल्या दहा वर्षांत टक्केवारी सातत्याने उंचावत गेली याची उघड चर्चा होते. देणारे व घेणारे दोघांनाही त्याचे काहीच वाटत नाही. पण कामासाठी जी तरतूद केलेली असते तेवढी प्रत्यक्षात खर्च होत नाही. त्यामुळे कामाचा दर्जा राहात नाही. दर्जा तपासला जात नाही. कंत्राटदार, दलाल, मध्यस्थ, राजकारणी, अधिकारी-कर्मचारी असे हितसंबंध गुंतल्यावर दुसरे काय होणार? बनावट बिले व बनावट प्रमाणपत्रे संगनमताने सादर होत असतील तर मुंबईची वाताहतच होणार...

ज्या दिवशी मुंबईतील पदपथ अतिक्रमणमुक्त होतील, उपनगरी रेल्वे स्टेशनच्या बाहेर आणि उपनगरातील प्रमुख रस्ते फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्त होतील, रस्त्यावर वडापाव, भाजीपाव, अंडाबुर्जीपासून चाईनीज विकणारे हटवले जातील, उपनगरी रेल्वेतील विनातिकीट प्रवाशांना संपूर्ण चाप लावला जाईल, रात्रीचे पुन्हा सुरू झालेले डान्स बार बंद होतील, त्या दिवशी भ्रष्टाचार आटोक्यात आला असे समजता येईल. वॉर्डात अतिक्रमण आणि बेकायदेशीर बांधकाम झाले तर तेथील वॉर्ड ऑफिसर व सीनिअर पोलीस इन्स्पेक्टर यांना जबाबदार धरले जाईल असे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी जाहीर केले होते, नंतर हीच तंबी अनेकांनी दिली पण ज्या वॉर्डात जास्त फेरीवाले व जास्त अतिक्रमणे त्या ठिकाणी वॉर्ड ऑफिस व पोलीस स्टेशनला पोस्टिंग मिळावे म्हणून स्पर्धा असते. मग भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शी कारभाराची अपेक्षा कशी करणार? मुंबईला तीन पालकमंत्री आहेत आणि मुंबई महापालिकेवर आयएएस दर्जाचे पाच आयुक्त आहेत. मुंबई महापालिकेच्या कारभारावर श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी आशीष शेलार यांनीच केली आहे. ते मुंबई भाजपाचे अध्यक्ष आहेत आणि मुंबईचे एक पालकमंत्री आहेत. श्वेतपत्रिका काढून जनतेसमोर एकदा वास्तव पुढे यावे हीच अपेक्षा.

# विठूरायाची मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सपत्नीक महापूजा

## शेतकरी,कष्टकरी व सर्व जनतेच्या सुख-समृद्धीसाठी पंढरीनाथाच्या चरणी फडणवीसांचं साकडं!

**पंढरपूर (वृत्तसंस्था)-आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सपत्नीक आज पहाटे अडीच वाजता विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली. विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात भक्तीचा महापूर लोटला असून चंद्रभागेच्या तीरावर स्नानासाठी भाविकांची झुंबड उडाली आहे.विठ्ठलाची महापूजा संपन्न झाल्यानंतर मुख्यमंत्री आपल्या कुटुंब आणि नाशिकमधील मानाचे वारकरी उगले दाम्पत्यासह रुक्मिणी मातेच्या दर्शनाला गेले. इथं रुक्मिणी मातेला दुग्धाभिषेक घालून मुख्यमंत्री फडणवीस आणि उगले दाम्पत्यांनी पूजा केली. त्यानंतर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा फडणवीस यांनी व्यक्त केली.यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.



# ठा.आडगाव येथे आषाढी एकादशी निमित्त दिंडी

**जातेगांव (प्रतिनिधी)**-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकर आडगाव यांच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने गावामध्ये दिंडीचे आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेमध्ये दिंडीत सहभागी होत टाळ मृदुंगाच्या तालावर विठू नामाचा जयघोष केला त्यामुळे सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील प्रसिद्ध महारुद्र मंदिरासमोर दिंडीचे गोल रिंगण घेण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी,शिक्षकांनी व ग्रामस्थांनी टाळ मृदुंगाच्या तालावर फुगड्या खेळण्याचा आनंद घेतला. गावातील भजनी मंडळाच्या सदस्यांनी आणि विद्यार्थ्यांनी अभंग, भारुडे व भक्ती गीते सादर केली. यानंतर बजरंगबलीचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांनी ग्राम प्रदक्षिणा पूर्ण केली. शेवटी प्रसाद वाटप होऊन दिंडीचा हा नयनरम्य अनुपम सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये गावातील आबाल वृद्धांनी उस्फुर्त सहभाग घेतला.

हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक शेजाळ सर तसेच शिक्षक भारती सर, बटुळे सर, गोसावी सर, कोकाटे मॅडम, गिरी मॅडम व सौदागर मॅडम यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख श्री पवार सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मातृ पितृ पूजन व भव्य कीर्तन महोत्सव

## महोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा -ह.भ.प.भाग्यश्री ताई भाग्यवंत

**बीड (प्रतिनिधी)**-श्री गुरु पौर्णिमेच्या पावन दिवसाचे औचित्य साधून ज्यांनी जन्म दिला त्यांनी या पावन भूमीत आपल्याला लोकसेवेची संधी ज्यांच्यामुळे मिळाली अशा जीवनातील महत्त्वाच्या गुरूंचे म्हणजेच आई वडिलांचे हा सेवा करण्याचा उत्सव साजरा करण्याचा दिवस म्हणून १० जुलै २०२५, गुरुवार रोजी सायंकाळी ६ते ८या वेळेत लासुरणे गावात मातृ-पितृ पूजन व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे अध्यात्मभूषण ह. भ. प. सौ. भाग्यश्रीताई भागवत भाग्यवंत यांच्या हस्ते त्यांचे माता-पित्यांचे पूजन. हा पूजन सोहळा कृतज्ञतेची जाणीव करून देणारा आणि भारतीय संस्कृतीतील मातृ-पितृ वंदनेचे श्रेष्ठत्व अधोरेखित करणारा ठरणार आहे.

यानंतर वाणी भूषण ह. भ. प. श्री संतोष महाराज कवठाळे (देवदैठणकर) यांचे प्रभावी, भावस्पर्शी आणि भक्तिरसपूर्ण हरिकीर्तन होणार असून, यागुरु पौर्णिमेच्या माध्यमातून मातृ पितृ भक्ती, गुरुभक्ती व संतसाहित्याची अमृतवाणी रसिकांपर्यंत पोहोचवली जाईल.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन ह. भ. प. सौ. भाग्यश्रीताई भागवत भाग्यवंत, कुमारी तेजश्री गोरे (महाराष्ट्र पोलीस), कुमार राम गोरे, आणि श्री. शाम गोरे यांच्या संयोजनातून करण्यात आले आहे.



# यमादेवी विद्यालयाच्या वतीने गायकवाड सर, आघाव सर,बांगर सर यांचा निरोप समारंभ संपन्न

**गेवराई (प्रतिनिधी)**-यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले श्री. गायकवाड सर श्री. आघाव सर श्री.बांगर सर यांना शाळेच्या वतीने सेवापुर्ती निमित्त निरोप देण्यात आला. याप्रसंगी शारदा स्पोर्ट अकॅडमी प्रमुख रणवीर काका पंडित, यांच्यासह साहेबराव चव्हाण, (संचालक जयभवानी सहकारी साखर कारखाना)साहेबराव पांढरे (माजी जि.प.सदस्य) तसेच .शंकरराव पवार (चेअरमन सेवा सहकारी सोसायटी) या सोबतच संस्थेचे सह प्रशासकीय अधिकारी गोगुले सर, लेखाधिकारी हाटोटे सर, गावातील पदाधिकारी, पत्रकार जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील शिक्षक ,कर्मचारी मुख्याध्यापक, प्राचार्य उपस्थित होते. यावेळी मा. रणवीर काका पंडित यांनी



तुम्ही सेवानिवृत्त झाला तरी शिवछत्र चे दरवाजे आपणास साठी नेहमी खुले आहेत . असे म्हटले. या प्रसंगी सत्कारमूर्तींचा कुटुंबासह मा. काका व मान्यवरांच्या,व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ड. चव्हाण, माजी सरपंच सतीश चव्हाण, शाळेचे जेष्ठ शिक्षक सायंबर सर यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री.अरुण हाटकर सर, सूत्रसंचालन गाडे सर,तर सत्कारमूर्तींचा परिचय गव्हाणे सर यांनी करुन दिला. तर आभार गायकवाड सर यांनी मानले. सत्कारमूर्ती गायकवाड सर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता होऊन सर्वांनी भोजनाचा लाभ घेतला. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, गावातील पदाधिकारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पत्रकार अदीजन उपस्थित होते.

# पावनधाम दिंडीत मंत्री आशिष शेलार सहभागी

**केज (प्रतिनिधी)**-संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील पावनधाम दिंडीत राज्याचे मंत्री आशिष शेलार यांनी सहभाग घेतला. मागच्या अनेक वर्षापासून आषाढी एकादशी निमित्त विठोबाच्या भेटीस केज तालुक्यातील श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथील दिंडी आषाढी एकादशी निमित्त देहू ते पंढरपूर जाते. श्रीक्षेत्र प्रतिदेहू संत तुकोबाराय पावनधाम संस्थांचे संस्थापक अध्यक्ष ह. भ. प.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी निघते. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी संत तुकोबाराय पावनधामची दिंडी संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी झाली. यावर्षी वारीचे वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्र राज्याचे मंत्री आशिष शेलार यांनी पावनधाम दिंडीत सहभाग घेतला. यावेळी महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्याबरोबर फुगडीचा आनंद घेतला. मंत्री महोदयांनी पावनधाम दिंडी मध्ये एक तास वारकरी बांधवांशी संवाद साधला. यावेळी गणेश महाराज भगत, प्रशांत महाराज निगडे, अच्युत महाराज व्हटटीकर ,दिलिप महाराज गगणबीडकर, शाम महाराज भिसे ,अमोल महाराज, हनुमंत महाराज शिरसाट यांची उपस्थिती होती.



# कोचिंग क्लासेस व वसतिगृहांतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी पोलीसांनी घेतली महत्वपूर्ण बैठक

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**- खाजगी कोचिंग क्लासेस व वसतिगृहांतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी पोलीसांनी शहरातील सर्व कोचिंग क्लासेस व वसतिगृह चालकांची एक महत्वपूर्ण बैठक घेतली असून विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्रथम प्राधान्य द्यावे असे आवाहन करुन टवाळखोरांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.सध्या राज्यभरात कोचिंग क्लासेस, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रे व वसतिगृहांमध्ये विद्यार्थिनींवरील छेडछाड व अत्याचाराच्या घटना वाढीस लागल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना अंबाजोगाईत घडू नयेत यासाठी शहर पोलीस प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात येत आहेत.



याच अनुषंगाने बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहरच्या वतीने आनंदनगर मधील ट्युशन परिसरात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस अंबाजोगाई शहरातील एकूण ४५ कोचिंग क्लासेस, स्पर्धा परीक्षा केंद्रे, अभ्यासिका व वसतिगृहांचे संचालक उपस्थित होते. बैठकीत विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत विविध कठोर उपाय योजना करण्यावर भर देण्यात आला. त्यानुसार सर्व क्लासेस, अभ्यासिका व वसतिगृह परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, तक्रार पेटी व रजिस्टर उपलब्ध करून देणे, सुरक्षा रक्षकांची नेमणूक, स्वतःची पार्किंग व्यवस्था तयार करणे, मुलींसाठी स्वतंत्र व स्वच्छ स्वच्छतागृहांची सुविधा, १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांना दुचाकी चालवण्यास मज्जाव व त्यांच्या पालकांना स्पष्ट सूचना देणे आदी महत्त्वाच्या बाबींची पूर्तता करण्याबाबत संचालकांना सूचना देण्यात आल्या.या बैठकीसाठी पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे, पोलीस हवालदार संतोष बदने उपस्थित होते.पोलीस प्रशासनाने स्पष्टपणे सांगितले की, सुचना देऊनही जर १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांना दुचाकी वापरू दिल्या तर संबंधित पालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जाईल. तसेच शाळा, कॉलेज व क्लासेस परिसरात विनाकारण फिरणाऱ्या टवाळखोरांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील पोलिसांनी दिला आहे.पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहरच्या वतीने सर्व शैक्षणिक संस्थांना सहकार्य करत विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी सजग पावले उचलण्यात येणार असल्याचा विश्वास या बैठकीतून देण्यात आला.

# विद्यार्थ्यांनो व्यसनांपासून दूर राहा अपर पोलीस अधीक्षक तिडके

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**- विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून समाजाचे एक जबाबदार घटक बनावे, तसेच कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी केले.

अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी नूतन विद्यालयात विविध पातळीवर खेळलेल्या विजेत्या विद्यार्थी खेळाडूंच्या आयोजित सत्कार समारंभात त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होत्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी होते.मुख्याध्यापक अपर्णा पाठक , उपमुख्याध्यापक व्ही.के.गायकवाड, पर्यवेक्षक आर. एस .मठपती यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. श्रीमती तिडके व मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंचा व क्रिडा शिक्षक बापुराव गोविंदवाड , खुशाल परदेशी यांचा गौरव करण्यात आला.

अपर पोलीस अधिक्षक चेतना तिडके यांनी आपल्या भाषणात, आजच्या तरुणाईमध्ये वाढत्या व्यसनाधीनते बद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, व्यसने केवळ व्यक्तीचेच नव्हे, तर कुटुंब आणि समाजाचेही मोठे नुकसान करतात. चांगले शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भविष्य घडवावे आणि त्यासोबतच सामाजिक मूल्यांची जपणूक करावी असे त्या म्हणाल्या.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारी , सोशल मिडीया , वाहतूक नियम , गुन्हेगारी , मुलींची छेडछाड आणि इतर समाजविघातक कृत्यांपासून



दूर राहण्याचा सल्ला दिला. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, कायद्याचे पालन करून एक सुजाण नागरिक म्हणून जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या वेळेचा सदुपयोग करून विधायक कामांमध्ये लक्ष घालावे आणि समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असेही तिडके यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला, शाळा प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. अपर पोलीस अधिक्षक तिडके यांच्या आवाहनाने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.कार्यक्रमाचे अध्यक्ष गणपत व्यास यांनी अध्यक्षीय समारोप केला.भागवत मसने यांनी सुत्रसंचालन करुन आभार व्यक्त केले.

# प्रा.सपाटे सरांचा सेवापूर्ती गुण गौरव सोहळा उत्साहात साजरा

## रमेशराव आडसकर,डॉ.अशोक थोरात,सीता ताई बनसोड यांची प्रमुख उपस्थिती

**केज । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित, वसंत महाविद्यालय केज येथे प्रा.गोपीचंदजी सपाटे सर यांनी तब्बल तीस वर्षे विद्यार्थी घडवण्याची सेवा केली आहे.शासकीय नियमानुसार ते आज वयाच्या आठ्ठावणव्या वर्षी सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांचा सेवापूर्ती गुणगौरव सोहळा विठाई मंगल कार्यालय केज येथे शनिवार रोजी उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबासहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर हे होते.यावेळी बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोकरावजी थोरात साहेब,उपजिल्हाधिकारी निलंगा सन्माननिय.शरदजी झाडके साहेब ,केज बाजार समिती चे सभापती सन्माननिय.अंकुशरावजी इंगळे साहेब,केज नगर पंचायत च्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड मॅडम,केज नगर पंचायत चे गटनेते सन्माननिय.हारूणभाई इनामदार साहेब,केज तालुक्याचे शिक्षण विस्तार अधिकारी सन्माननिय.बेडसकर साहेब, सन्माननिय.डायट कॉलेजचे प्रा. साईगुंडे ,तुपसागर साहेब, गदळे सर,ऍड.सुभाष शिंदे साहेब, प्राचार्य प्रकाश धेंडे,डॉ.काळे साहेब, इनामदार सर, जगताप सर,कवडे सर,स्वामी सर इ.प्रमुख पाहुणे उपस्थित होते.



यावेळी वसंत ज्युनिअर कॉलेज च्या विद्यार्थीनीं कु.गायकवाड सायली,कु.कापरे जान्हवी, यांनी मनोगत व्यक्त केले.सरांनी वर्गात विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे दीले तसेच कठीण इंग्रजी विषय सोप्या पध्दतीने शिकवतात.विद्यार्थी चुकला तर रागावतात पण माया देखील खुप लावतात.आसे मनोगतात सांगितले.सन्माननिय.डॉ.थोरात साहेब,झाडके साहेब, जगताप सर, कवडे सर,साईगुंडे सर,हारूणभाई इनामदार,सीताताई बनसोडे मॅडम,यांनी प्रा.सपाटे सरांच्या उत्कृष्ट कार्याची सविस्तर भाषणात मांडणी केली.डॉ.थोरात साहेब यांनी सपाटे सरांचा आत्मविश्वास,धाडस,संकटवर मात करण्यासाठी लागणारी जीद्द , इच्छा शक्ती या सर्व पैलूंचा भाषणात आलेख मांडला.कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशरावजी आडसकर साहेब यांनी प्रा.सपाटे सरांना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला.सरांच्या सेवानिवृत्त मुळे वसंत ज्युनिअर कॉलेज ला त्यांची उणीव होणार आहे,ही खंत व्यक्त केली. सत्कारमूर्ती सन्माननिय.प्रा.सपाटे सरांनी त्यांच्या भाषणात १९९० ते२०२५ पर्यंत जीवनप्रवास सांगीतला.शिक्षकाच्या अंगी निर्व्यसनीपणा,चारीत्र्यसंपन्नता, प्रामाणिकपणा, शिस्त आणी विद्यार्थ्यांन प्रती आस्था,प्रेम,जिव्हाळा हे गुण असणे आवश्यक आहे.हे त्यांनी सांगितले.या वेळी सरांनी आदरणीय.कै.माजी आमदार तात्यांनी नौकरी ची संधी दिली संस्थेचे ऋण व्यक्त केले.आडसकर परीवाराच्या कायम ऋणात राहाण्याचा शब्द त्यांनी दिला.सन्माननिय.रमेशरावजी आडसकर साहेब यांनी कधीपण बोलावले की तात्काळ हजर राहण्याचा संकल्प भाषणात सांगीतला.पुढे देखील प्रा.सपाटे सर सन्माननिय.रमेशरावजी आडसकर साहेब यांचे निष्ठावंत मावळे म्हणूनच काम करत राहाणार आहेत.प्रा.सपाटे सरांनी सर्वांचे मनापासून आभार व्यक्त केले.कार्यकृमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन प्रतीक गायकवाड भाटशिरपूरा ता.कळंब यांनी केले.तर आभार सौ.अमृता अशोक धस यांनी मानले.सदरील कार्यक्रम खुपच भव्य दिव्य पार पाडला गेला. नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहर बचाव मंचच्या वतीने परवेज कुरेशी व गणेश बजगुडे यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंच, जि.इंटक काँग्रेस कमिटी, लेक लाडकी अभियान समिती, बीड शहर बचाव मंचचे संचालक नितीन जायभाये, रामधन जमाले, बाजीराव ढाकणे यांनी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या बीड तालुका अध्यक्षपदी गणेश बजगुडे तसेच बीड शहराध्यक्षपदी परवेज कुरैशी यांची फेरनियुक्ती झाल्याबद्दल हॉटेल अन्विता येथे सत्कार केला यावेळी भैय्या गोरे, हनुमंत घोडके आदी सहकारी उपस्थित होते. त्यांच्या फेरी निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## पांडुरंग आगळे व जितेंद्र देशमुख यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते बाबुरावजी आडसकर महा विद्यालयात पांडुरंग आगळे व जितेंद्र देशमुख यांच्या नियत वयोमानानुसार सेवा निवृत्ती झाली असल्या मुळे त्यांना महा विद्यालयाच्या वतीने सेवापूर्ती सोहळ्यात या दोघांनाही सपत्नीक सन्मानित करण्यात आले.पांडुरंग आगळे हे महाविद्यालयात १९९३ पासुन वरिष्ठ लिपिक म्हणून तर जितेंद्र देशमुख १९९७ पासुन प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून सेवेत कार्यरत होते.पांडुरंग आगळे हे महत्वाच्या परिक्षा विभागाचे काम पाहत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अडचणीत त्यांचे महत्वाचे योगदान होते असे प्राचार्य डॉ. माधवराव फावडे सर यांनी सांगितले. प्रयोगशाळा सहाय्यक



जितेंद्र देशमुख यांच्या ही कामाबद्दल गौरव केला.या सेवापुर्ती सोहळ्यात सौ.आगळे ताई व सौ.देशमुख ताई यांचा ही सत्कार अनुक्रमे डॉ.आशा बोबडे व डॉ.रतन गंगणे यांनी केला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिक्षक पी.एस. भोसले यांनी केले.या कार्यक्रमात डॉ.छत्रभुज इंगळे,डॉ.चत्रभुज सोळंके,डॉ.शाम जाधव, डॉ.नवनाथ काशिद, डॉ.सुनिल राऊत,डॉ. सुधीर आगळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.सत्कारमूर्ती आगळे व देशमुख यांनी ही आपल्या भावना व्यक्त केल्या.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.बाबासाहेब हिरवे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.प्रशांत क्षीरसागर यांनी केले.

## वैद्यनाथ विद्यालय SIT च्या जाळ्यात...?

# रणजीत देशमुखची थेट एस.पी.नवनीत कावंत कडे बोगस शिक्षक भरतीची तक्रार

**परळी । प्रतिनिधी**

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आधिवेशानात बोगस शिक्षक भरती घोटाळ्यावर डखढ नेमण्याची घोषणा केली आहे. माघील काही दिवसापासून वैद्यनाथ विद्यालय परळी वै. हि शाळा बोगस शिक्षक भरती घोटाळ्यसाठी खूप चर्चेत आहे. या शाळेमध्ये १-२ नव्हे तर २० च्या जवळपास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बोगस रित्या भरण्यात आलेले आहे. जुन्या तारखेचे नियुक्त्या दाखवून व सह्या स्कॅन (डउ-छ) करून हे नियुक्त्या घेण्यात आलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर या बोगस कर्मचाऱ्यांनी थकीत वेतनच्या नावाखाली शासनाची आर्थिक फसवणूक रून लाखोचे थकीत वेतन उचलले आहे. काही शिक्षक तर शाळेत रुजू नसून पगार उचलतात. वारंवार तक्रार करून देखील शिक्षणाधिकारी व उपसंचालक कार्यालय या प्रकरणी कोणतीही दखल घ्ययला तय्यार नाहीत. मे २०१२ पासून शिक्षक भरतीवर बंदी असल्यामुळे या शिक्षकांच्य नियुक्त्या मे २०१२ पूर्वीच्या दाखविलेल्या आहेत. खर तर हे सर्व शिक्षक २०१२ पासून शाळेत कार्यरत नाहीत त याचे हि पुरावे रणजीत रणजीत देशमुख यांनी बीड अधीक्षक कार्यालयात दाखल केले



आहे.या आर्थिक घोटाळ्यातील संपूर्ण अधिकारी कर्मचारी, तत्कालीन संस्थाचालक, मुख्याध्यापक यांचे बँक खाते तपासण्यात यावे. हा घोटाळा पूर्व नियोजित व संगनमताने केलेला असल्याने यात सामाविष्ठ असलेल्या सर्वांवर मोक्का (चउजउ-) अंतर्गत कार्यवाही करण्यात यावी. या आर्थिक घोटाळ्यात बनावट कागदपत्रे तय्यार करणे, बनावट स्वाक्षऱ्या करणे, बनावट शालार्थ खऊतयार करणे, बनावट नियुक्ती पत्र देणे, बनावट मान्यता देणे, आर्थिक अनियमितता करणे, आर्थिक रक्कम स्वीकारणे (लाचलुचपत) या कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात यावा,

तसेच प्रत्येक शिक्षकाचे खात्यावर जी रक्कम कोषागार कार्यालयाकडून जमा झाली आहे ती संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करणे, जो पर्यंत रक्कम वसूल होत नाही तो पर्यंत यात समाविष्ठ असलेले मुख्याध्यापक, तत्कालीन संस्था कार्यकारी मंडळ, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, झ-ध णछखढ कार्यालय अधीक्षक व वेतन अधीक्षक व शिक्षण उप संचालक यांच्या मालमत्ता जप्त करण्यात याव्यात अशी लेखी तक्रार रणजीत देशमुख यांनी पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे केली आहे.रणजीत देशमुख यांनी शिक्षण विभागाला वारंवार तक्रार करून देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता या सर्व गोष्टींना कंटाळून, वैद्यनाथ विद्यालयात झालेल्या बोगस शिक्षक भरतीची तक्रार दि. ०२.०७.२०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक कार्यालया बीड येथे केलेली आहे आणि वैद्यनाथ विद्यालयावर डखढ लावण्याची मागणी केली आहे. आता बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावंत या प्रकरणी कोणती कार्यवाही करतील यावर सगळ्यांचे लक्ष केंद्रित आहे.शाळेत शिक्षक रुजुच नाही आणि काढला पगार कणाके, गट शिक्षणाधिकारी पं.स. परळी यांची कृपा..!संस्थेचे वाद असल्यामुळे सध्या वैद्यनाथ विद्यालयावर प्रशासक म्हणून, मुख्याध्यापक पदी वैद्यनाथ विद्यालयाचा काहीही अभ्यास नसणारे परळीचे गट शिक्षणाधिकारी कणाके यांच्याकडे आहे. संस्थेत वाद असल्याचा फायदा घेत कणाके यांनी मनमानी कारबार सुरु केला आहे. शाळेत कार्यरत नसलेल्या व रुजू नसलेल्या कर्मचाऱ्यांचे पगार ते काढत आहे व माहिती अधिकारात काही मागितल्यास उत्तर न देता दिशा भूल करत आहेत, आणि शासनाची आर्थिक करणाऱ्यांना वाचविण्याचा काम परळी तालुका गटशिक्षणाधिकारी कणाके करत आहेत.

## केज पोलिसांनी गोवांशिय प्राण्याच्या व हाडांची वाहतूक करणारा टेम्पो घेतला ताब्यात




**केज । गौतम बचुटे**

केज पोलिसांच्या पथकाने गोवंशीय प्राणी आणि इतर प्राणी यांचे कत्तल केलेले हाडे यांची वाहतूक करणारात टेम्पो ताब्यात घेतला आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. ६ जुलै रोजी पोलीस पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाली की, बीडकडे एक आयशर टैम्पो क्र (एम एच-१२/एच डी-३३४८) येत असून त्या टेम्पो मधून प्रचंड दुर्गंधी येत आहे. त्यात काही तरी संशयित असावे अशी माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी सहाय्यक पोलिस निरीक्षक, संदीप मांजराने, पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस निरीक्षक इनामदार, यांना कारवाईचे आदेश दिले. स्वतः पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक, संदीप मांजराने, पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस निरीक्षक इनामदार, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चव्हाण, शंभुदेव दराडे, सानप, शिवाजी गित्ते, संतोष गित्ते, गोरख फड यांनी सापळा लावून सदर टेम्पो केज तालुक्यातील कोरेगाव जवळ अडविला.

पंचासमक्ष पोलीसांनी त्या टेम्पोची पाहणी केली असता त्या मध्ये गोवंशिय प्राणी आणि कत्तल केलेल्या प्राण्यांच्या हाडांना चिटकलेले मांस, हाडे, मुंडके इतर अवाताव असल्याचे आढळून आहे. पोलिसांनी त्या दुर्गंधीयुक्त हाडांची विल्हेवाट शिंदी येथील गायरान जमिनीत लाऊन सदर वाहन पोलीस ठाण्यात आणले आहे.सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांच्या फिर्यादी वरून ट्रक चालक अकबर इस्माईल टकारी यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात प्राण्याचा छळ प्रतीबंधक अधिनीयम १९६० चे कलम ११ (१) (इ) आणि महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनीयम १९९७६ कलम ५(सी),५(बी) यासह महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ कलम ११९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे तपास करीत आहेत.

# ऊसतोड मजुराच्या मुलाचा आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियन शिपमध्ये यशस्वी डंका

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**-अंबाजोगाई शहरातील मंगळवार पेठ भागातील रहिवाशी असलेल्या ऊसतोड कामगाराचा मुलगा चि. आदित्य दिलीप जाधव (वय १७) या तरुणाने एशियन चॅम्पियन शिप मध्ये रौप्यपदक पटकावत आपल्यां उल्लेखनीय कामगिरीने अंबाजोगाई शहरासह संपूर्ण भारत देशाची मान उंचावली आहे. व्हिएतनाम येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात रौप्यपदक (सिल्वर मेडल) पटकावून आदित्यने जागतिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत अपार मेहनत, कठोर सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आदित्य जाधवने हे दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्याची ही झेप केवळ वैयक्तिक नाही, तर लाखो गरीब घरातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.चि आदित्यची प्रेरणा इतर तरुण घेऊन अपार मेहनत तथा कष्टाने त्यांच्यासारखेच यश संपादन करून समाजाचे त्याचबरोबर आपल्या देशाचे नाव उज्वल करतील अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आदित्यचा सत्कार व सन्मान करतांना व्यक्त केली. आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थिती ला दोष न देता त्याने केलेल्या कष्टाचे हे फलित असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे नुकताच आदित्य जाधवचा शाल व फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना आदित्यने काटेकोर प्रशिक्षण, आहार, नियमित व्यायामासोबतच योग्य प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती यांच्या जोरावरच आपन हा यशस्वी प्रवास केला असल्याचे सांगितले.क्रीडा क्षेत्रात अडथळे असले तरी हार न मानता चिकाटीने पुढे जाण्याची जिद्द ठेवण्याचे आवाहन यावेळी आदित्य जाधव याने केले आहे .

या सत्कार प्रसंगी आदित्यच्या नातेवाईकासह माजी नगरसेवक दिनेश भराडिया, दत्ता सरवदे, रफिक गवळी, विजय रापतवार, वजीर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राजकिशोर मोदी यांनी आदित्यच्या यशाचं कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077